# देवदूत

**- डॉ. सुरेश गि. जोशी** (फिलाडेल्फिया, पेन्सिल्वेनिया)



बालपणी ज्याला मी
सर्वत्र शोधत असे,
तो कॉलेजमध्ये मला अचानक
माणसात भेटला ।
परीक्षक, प्राध्यापक, सहकारी,
नि मग मित्र, अशा अनेक भूमिकेत
तो मला दिशा दाखवित गेला ।
अनेकांना मदतीचा हात देणारे
नि कुठेही सही न घेणारे
एक अनोखे व्यक्तिमत्व ।
तो अचानक निघून गेला
पुढील प्रवासासाठी,
कदाचित नवीन जगात!
की, नवीन मिशन वर?
जीवनाला माझ्या
एक कलाटणी देऊन जाणारा,
माझा देवदूत ।
नि मागे ठेवून गेला तो
सुगंधित स्मृती अन एक प्रेरणा ।

**टीप:** डॉ. डी. आय. बोरोले यांचे ‘थँक्स गिव्हिंग डे’ २३ नोव्हेबर, २०१७ रोजी निधन झाले. त्यांच्या पुण्य-स्मरणार्थ लिहिलेली ही कविता!

***